# खराडे ॲग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: आठवा || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ सप्टेंबर, २०२४





## कृषी जगतातील विशेष घडामोडी

- लाडकी बहीण योजनेनंतर सरकारची आणखी एक मोठी योजना, शेतकऱ्यांना मिळणार मोफत 'वीज'.
- लंपी रोगाचा पुनरुदय: जनावरांची काळजी घेण्याचे आवाहन!
- चालू आर्थिक वर्षात किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून कृषी आणि संबंधित कामांसाठी 3 लाख रुपयांचे अल्पकालावधीचे कर्ज देण्याची योजना सरकारने मंजूर केली आहे. या कर्जावर शेतकऱ्यांना व्याज सवलतीचा लाभ मिळणार आहे.
- एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत AutoNxt X 45 ट्रॅक्टरचे लोकार्पण झाले. एका चार्जिंगवर 6 ते 8 तास काम करतो.

## महाराष्ट्राला कृषी क्षेत्रातील सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार

नवी दिल्ली: महाराष्ट्राला राज्याला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार १५ व्या कृषी नेतृत्व समिती २०२४ आणि ॲग्रीकल्चर टुडे मासिकाच्या वतीने देण्यात येतो. केंद्रीय कृषीमंत्री श्री. शिवराजसिंग चौहान यांनी हा पुरस्कार मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि कृषीमंत्री श्री. धनंजय मुंडे यांना प्रदान केला.

या पुरस्काराचे मानांकन पर्यावरण संरक्षण, अन्न सुरक्षा, आणि शाश्वत विकासात महाराष्ट्राने केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे झाले आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी हा पुरस्कार राज्यातील शेतकऱ्यांना समर्पित केला आणि त्यांच्या मेहनतीमुळेच हा पुरस्कार मिळाल्याचे सांगितले. पुरस्कार निवडीसाठी परीक्षक आणि निवडक मंडळींच्या कार्याचे त्यांनी आभार मानले.




|| पुढील पानावर ||

- गीर गायी; जाती-प्रजाती
- यशोगाथा
- बोल अनुभवाचे



Plot No G 251, M.I.D.C. Baramati || 9309253091 || 9209317742

# विविध भागांमध्ये गायींचे महत्त्व...



बारामतीः भारतामध्ये गायीला, अत्यंत विशेष स्थान आहे; हे या मागील अंकात आपण पहिले. प्रत्येक प्रदेशानुसार व तिथल्या वातावरणानुसार गायींची भिन्न वैशिष्ट्ये आढळतात. या लेखात, आपण भारतातील विविध भागांमध्ये गायींचे काय महत्त्व आहे ते पाहूया.

उत्तर भारतात गाय ही एक पूजनीय प्राणी मानली जाते. विशेषतः मथुरा आणि वृंदावनमध्ये, गाईंचं भगवान श्रीकृष्णाशी घट्ट नातं आहे. कृष्णाच्या गोपालक रूपाने, गाईंची सेवा हे एक धर्मकार्य समजले जाते.

तर, पूर्व भारतात, विशेषतः बिहार आणि बंगालमध्ये, गाईंचा शेतीत महत्त्वाचा वाटा आहे. गाईंच्या शेणाचा उपयोग शेतीसाठी खत म्हणून केला जातो. त्यामुळे गाईंचं स्थान इथे केवळ धार्मिक नाही, तर शेतीच्या विकासासाठीही अत्यंत महत्त्वाचं आहे.

पश्चिम भारतात, विशेषतः महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये, गाईला धनाची देवी लक्ष्मीचं रूप मानलं जातं. येथे गाईच्या शेणाचा वापर घरातल्या अंगणात आणि धार्मिक विधींमध्ये पवित्रता आणण्यासाठी केला जातो. इथे गोपाष्टमीच्या दिवशी गाईचं पूजन करून गाईचं महत्त्व अधोरेखित केले जाते.

दक्षिण भारतात, गाई फक्त धार्मिक पूजेचा भाग नाहीत, तर त्या आपल्या दैनंदिन जीवनाशीही घट्ट जोडलेल्या आहेत. तमिळनाडू मध्ये पोंगल सणाच्या वेळी गाईला खास महत्त्व असतं. या सणात गाईंचं पूजन केलं जातं आणि त्यांना सजवलं जातं, कारण गाईंचं दूध आणि शेतीसाठी केलेलं काम या सणात विशेष मानलं जातं. यातून एक गोष्ट लक्षात येते की, भारताच्या प्रत्येक कोपऱ्यात, गाय ही केवळ एक प्राणी नसून, एक देवता, एक संस्कार, आणि एक श्रद्धेचं प्रतीक आहे. आपल्या संस्कृतीत गाईला आदर देणं हे आपलं कर्तव्य आहे.





# शेतकरी आत्महत्यांच्या वाढत्या घटनांचे विश्लेषण: सरकारच्या योजना कितपत प्रभावी?

विदर्भ हा महाराष्ट्रातील एक असा विभाग आहे, जिथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण अत्यंत आहे. गेल्या काही वर्षांपासून या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. शेतकरी आत्महत्यांच्या वाढत्या घटनांनी समाजाला हादरवून सोडले आहे!

**शेतकरी आत्महत्यांचा संबंधित आकडेवारी:**

विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्यांची अचूक संख्या निश्चित करणे कठीण आहे. कारण, अनेकदा आत्महत्यांचे कारण म्हणून शेतकरी कर्ज ही बाब नोंदवली जात नाही. परंतु २०१४ ते २०२४ या कालावधीत विदर्भात सुमारे १८,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. २०१४ ते २०१८ दरम्यान दरवर्षी सरासरी २,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे, तर २०१९ ते २०२४ या कालावधीत हे प्रमाण कमी होण्याऐवजी थोडेफार वाढलेले दिसते.

शेतकरी आत्महत्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारने अनेक योजना जाहीर केल्या आहेत, तरीही आत्महत्यांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. कारण अनेक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. कागदोपत्री योजना उत्तम असल्या तरी प्रत्यक्षात त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. योजनांचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी प्रक्रिया कठीण आणि वेळखाऊ असते. तसेच अनेक शेतकऱ्यांना सरकारच्या योजनांची संपूर्ण माहिती नसते किंवा योग्य मार्गदर्शन मिळत नाही. यामुळे ते योजनांचा लाभ घेण्यात अयशस्वी ठरतात. त्याचबरोबर बँकांचे कर्ज वेळेवर न मिळणे किंवा कर्जाची परतफेड न होणे यामुळे शेतकरी सावकारांकडून कर्ज घेण्यासाठी मजबूर होतात, जे उच्च व्याजदरावर असते.






यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज वाढत जाते, आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडावे लागते. सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी घेतलेल्या उपाययोजनांना संपूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे. तसेच, या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी जागरूकता, प्रशिक्षण, आणि तांत्रिक मदत महत्त्वाची आहे. यामुळेच शेतकरी आत्महत्या कमी करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल उचलता येईल.

विदर्भातील शेतकरी आत्महत्या हा एक गंभीर प्रश्न आहे, जो सखोल विचार आणि ठोस उपाययोजनांची मागणी करतो. कर्जमाफी, पीक विमा, बाजार सुधारणांसोबतच शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक, आणि सामाजिक दृष्टिकोनातून मदत करण्याची गरज आहे. या दिशेने पावले उचलल्यासच या समस्येवर ठोस उपाय मिळू शकतो.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न हा केवळ आकड्यांचा नाही, तर हे एक मानवी संकट आहे, ज्याला तातडीने आणि प्रभावी उपाययोजनांची आवश्यकता आहे.



# धैर्य आणि आत्मविश्वासाची प्रेरणादायी कथा: संगीता पिंगळे यांचा संघर्षमय प्रवास



**संगीता पिंगळे (शेतातील कामे करताना)**

बारामती, ऑगस्ट ३१: संगीता पिंगळे यांची प्रेरणादायी कथा आहे, कठीण प्रसंगांवर मात करणाऱ्या आणि सातत्याने नियतीशी झुंज देत आपल्या कुटूंबाचे पालन पोषण करणाऱ्या व अनेक अडचणींपासून त्यांचं रक्षण करणाऱ्या एका स्त्रीची!

संगीता यांच्या मते, कठीण प्रसंग हे व्यक्तीच्या क्षमतेची कसोटी घेतात. जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात केल्यावरच खऱ्या अर्थाने जीवनाला अर्थ प्राप्त होतो. संगीताने त्यांच्या सासूसोबत कुटुंबातील जबाबदाऱ्यांशिवाय अनेक इतर कर्तव्ये देखील पार पाडली. शेतीच्या कामांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. पण अशातच, संगीताच्या आयुष्यात एक मोठा धक्का बसला, जेव्हा एका अपघातात त्यांच्या पती आणि सासऱ्यांचा मृत्यू झाला.

या दुर्दैवी घटनेनंतरही त्यांनी खंबीरपणे कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. सासऱ्यांच्या नेतृत्वाखाली कुटुंबातील सर्वजण आपापल्या भूमिका पार पाडत होते, परंतु अपघातानंतर सर्वजण दिशाहीन झाले. संगीताने आपल्या सासू आणि मुलांच्या दुःखात त्यांना साथ दिली आणि कुटुंबाची काळजी घेतली. तसेच शेतातील काम देखील त्या आत्ता एक हाती पाहायला लागल्या. त्यांच्या निर्णयांवर अनेकदा शंका व्यक्त केली, परंतु संगीताने हार मानली नाही. उलट, त्यांनी या शंकांना आव्हान मानून त्यावर मात करण्याचा ठाम निर्णय घेतला. द्राक्षबाग लागवड करणे सोपे नाही; लहानशी चूकदेखील धोकादायक ठरू शकते, परंतु त्यांनी धैर्याने ही जबाबदारी घेतली.

त्याच्या कामात ट्रॅक्टर आणि इतर सर्व नवीन वैशिष्ट्यांचा एकामागून एक समावेश केला. यामुळे त्यांचे उत्पादन वाढले आणि त्यांच्या उत्पादनांची मागणी वाढली. आणि हे सतत चालू आहे. दर्जेदार उत्पादन तयार करण्याचा आणि त्या क्षेत्राचा कोणताही पूर्व अनुभव किंवा ज्ञान न घेता एक कार्यपद्धती मांडण्याचा हा प्रचंड निश्चय आज त्यांच्या अस्तित्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येकासाठी तो एक उज्ज्वल प्रेरणा स्रोत आहे. उपलब्ध साधनसामग्रीच्या साह्याने नव्याने निर्माण केलेल्या कार्यपद्धतीची मांडणी करणे हे अत्यंत कष्टाळू प्रयत्नापेक्षा कमी नाही. संगीता यांनी त्यांच्या मूल्यांवर आधारित एक मजबूत पाया उभा केला आहे. संगीत पिंगळे या संघर्षमय प्रवासात सतत प्रगतीच्या मार्गावर चालत राहिल्या. त्यांच्या आदर्शांचे पालन करत त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनोखे योगदान दिले आहे. संगीता पिंगळे यांच्या कार्यास खराडे अ‍ॅग्रोचा सलाम!

## || बोल अनुभवाचे ||

### सोमनाथ, शेळगाव

मागील चार वर्षांपासून मी खराडे अॅग्रोचं फ्रूट नेट वापरतो आहे. हे वापरल्यामुळे फळांची रोगाला बळी पडण्याची शक्यता एकदमच कमी होते. त्यामुळे अनावश्यक औषध फवारणी करण्याची वेळच येत नाही. माझ्या बागेतील आंबा, संत्रा व पेरू या फळांसाठी याचा वापर केला आहे. याच्या वापारामुळे नक्कीच फळांच्या उत्पन्नात निदर्शीय वाढ जाणवते. पूर्वी आम्हाला फ्रूट नेट व अँटी फोग बॅग गुजरातवरून आणावे लागत असत. पण बारामतीतील खराडे अग्रोने याचे उत्पादन चालू केल्यापासून आम्हाला बाहेर कुठेही जावे लागत नाही. त्यामुळे आमचा वाहतुकीचा खर्च व वेळ दोन्ही वाचतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे खराडे अॅग्रोची सेवा तत्परता इतकी छान आहे ना की दुसरा पर्याय पहावाच वाटत नाही.

### सौ. सारिका करांडे, जुजारपूर

खराडे अॅग्रोचं फ्रुटनेट वापरल्याने फळे चिरत नाहीत. फळांवरच्या शिरा मऊ पडतात त्यामुळे फळं तजेलदार दिसतात. सोबत हे वापरल्यामुळे फळांचा रंग अबाधित राहतो. सहाजीकच या सर्व गोष्टींचा परिणाम फळाच्या उत्पन्नावरती पडतो. व उत्पादित झालेल्या मालाला भाव ही मिळतो.

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅग या दोन्ही गोष्टींसाठी आमचं हक्काचं ठिकाण म्हणजे 'खराडे अॅग्रो'. त्यांच्या मालाचा दर्जा आणि सेवा तात्परता याला तोडच नाही!

Plot no. G 251, M.I.D.C. Baramati

9309253091 || 9209317742